३९



# यशोदर्शन

## श्री यशवंतराव चव्हाण

मुख्यमंत्री, मुंबई राज्य

### यांच्या
### ४६ व्या वाढदिवसानिमित्त
### आठवणी

* प्रकाशक *

माजी विद्यार्थी वाङ्मय मंडळ, श्री शिवाजी विद्यालय, कराड. १९५९-६०

(पुर्नमुद्रण २०१२)

मूल्य रु. ३० /-

923.60954
MAN
G04265

Y.C.P. LIBRARY
923.60954/MAN
G04265

# संपादकीय.....

कराडचे सुपुत्र व भारताचे माजी उपपंतप्रधान ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात, त्यांच्या ४६ व्या वाढदिवसानिमित्त प्रसिध्द केलेल्या त्यांच्या आठवणीना उजाळा देऊन पुनः प्रकाशित करताना मला आनंद होता आहे. हा उपद्व्याप आमचे मार्गदर्शक गुरूवर्य श्यामराव द. घळसासी यांच्या प्रोत्साहनामुळे पार पडला. हा आठवणीचा मेवा सर्व वाचकांच्या सेवेसाठी.

ही पुनः प्रकाशित आवृत्ती गुरूवर्य श्री. प्र. ल. ऊर्फ शंकरराव करंबेळकर यांच्या पवित्र स्मृतीस सर्मपित.

सर्व लेखकांचे आभार.

दि. ३/७/२०१२ गुरुपौर्णिमा

सुधाकर अ. मंत्री
माजी विद्यार्थी वाङ्मय मंडळ
श्री शिवाजी विद्यालय, कराड.
१९५९-६०

YASHWANTRAO CHAVAN LIBRARY MUMBAI 400 021
923.60954
Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC NO. G04265
D. 6161 2015

# निवेदन...

शालेय वर्षात प्रसिध्द होणारी हस्तलिखिते, समयकालिके व विशेषांक हे आमच्या विद्यार्थी वाङ्मय मंडळाचे एक वैशिष्ठ्य आहे. केवळ एखादे उद्दिष्ट ठरवून त्यानुसारच आजपर्यंत प्रकाशित केलेल्या हस्तलिखितांत स्वतःचे असे एक आदर्शत्व विद्यार्थ्यानी प्रस्थापित केले आहे !

श्री. नामदार यशवंतरावजींच्या वाढदिवसानिमित्त असेच एखादे समयकालिक प्रसिध्द करावे या हेतूने आम्ही प्रयत्न सुरू केले व रविवारी ८-३-५९ रात्री एकंदर हाताशी असलेले साहित्य पाहूनन ते मुद्रित स्वरूपात प्रकाशित झाल्यास फारच चांगले होईल अशी कल्पना सुचली, नि लागलीच मुख्याध्यापकांनी या योजनेला मोठ्या हौसेने आजचे हे स्वरूप आणून दिले !

श्री. यशवंतरावजींच्या आठवणी मुलांनी जमा करून लिहिल्या आहेत. छापून प्रसिध्द करण्याची कल्पना सुचल्यानंतर अत्यंत अल्पावधीत काम पूर्ण करण्याकरिता 'दत्त प्रिंटिंग प्रेस' चे चालक श्री. नावडीकर बंधू यांनी अतिशय परिश्रम घेतले म्हणून या सुंदर नि सुबक स्वरूपात हे यशोदर्शन वाचकाना देता आले याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत !

श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना समृध्द नि संपन्न दीर्घायुष्य सतत लाभो व त्यांचे हातून भारतभूची अखंड सेवा घडो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून हे निवेदन संपवितो !

**विद्यार्थी वाङ्मय मंडळ**

१०-३-५९

श्री शिवाजी विद्यालय कराड.

# प्रस्तावना....

**श्याम द. घळसासी** एम.ए.बी.एड्.
११ विश्वास गार्डन बी ( सनसिटी रोड)
आनंदनगर, सिंहगड रस्ता पुणे -४११०५१
फोन : २४३४८७६७
मोबा. ९९६०१७५७२९

## बीज अंकुरे, अंकुरे

प्रिय विद्यार्थी चि. सुधाकर मंत्री यांना

सादर सप्रेम शुभाशीर्वाद. विशेष

तुमचे सविस्तर पत्र नुकतेच मिळाले. पत्र वाचून माझ्या आनंदाला जणू उधाणच आले. मी ते दोन, तीन वेळा थांबून थांबून वाचले. श्री शिवाजी विद्यालय, कऱ्हाडमधील माझ्या अध्यापकीय जीवनात माझे अंतरमन आता पुन्हा पुन्हा डोकावते आहे !

आज मला तीव्रतेने आठवते -

'इयत्ता ७ वीच्या स्कॉलरशीप परीक्षेच्या मार्गदर्शननाच्या निमित्ताने माझ्या व्यावसायिक जीवनात तुम्ही सर्वानी प्रवेश केलात, ते थेट शालान्त परीक्षेअखेर. आपले 'मराठीचे अध्यापक' म्हणून, आपले परस्परांचे भावविश्व व्यापून राहिले होते. पुढे उच्च शिक्षण नि व्यावसायिक जीवनातील अत्युच्च यश संपादन करूनही, आजही तीच ममत्व भावना तुम्ही जपली आहे. हे मी माझे भाग्यसंचित समजतो !' यश, कीर्ती, लौकिक संपादन करून, सेवानिवृत्तीनंतरचे प्रापंचिक समृध्द, समाधानी जीवन अनुभवत असतानाही, तुमची कृतज्ञभावना तुम्ही सर्वजणानी जपून ठेवली आहे. आजच्या काळात अत्यंत दुर्लभ गोष्ट आहे. विद्याभ्यासातील हुशारी व नोकरी, पेशाचे अधिकार पद किंवा डॉक्टर, वकील, इंजिनियर किंवा व्यापार अशा क्षेत्रात तुम्ही सर्वांनीच अपूर्व यश संपादन केले आहे. तरीही आपल्या बालपणीच्या वा शालेय उपक्रमांच्या आठवणी तनामनात जपणारी तुमची पिढी- भावी युवामनात आदर्श भावभावनांचे बीजांकूर अंकुरित करणारी ठरेल ! ठरो !! ही ईशचरणी माझी प्रार्थना.

'यशोदर्शन भाग-१' हे तुमच्या विद्यार्थी वाङ्मय मंडळाचे पहिले मुद्रित पुष्प, १९५६ मधील एका प्रासंगिक शुभ घटनेची आज साक्ष पटवणारे ठरते आहे.

तुम्ही सर्वजण दहावी इयत्तेत होतात. तुमच्या वाङ्मय मंडळाच्यावतीने त्यावेळी, मराठी साहित्य परिषद पुणेच्या, वाङ्मयीन परीक्षांची तयारी, शालेय व राज्य पातळीवरील वक्तृत्व स्पर्धाची तयारी, स्नेहसंमेलनातील नाटुकली, हस्तलिखिते इत्यादी उपक्रम सुरू असत. कविवर्य पंडित सप्रे, श्री. ना. ल. तथा नाना इनामदार, श्री. श्याम घळसासी यांच्या भोवती तुम्हा सर्वांचा गराडा पडलेला असे. निकोप स्पर्धा ( 'वर्दि कॉम्पिटेशन') म्हणजे काय? याचा

अनुभव मी त्यावेळी सतत घेत आलो. आपले मुख्याध्यापक व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्र. ल. ऊर्फ काकासाहेब करंबेळकर यांचे सतत व सबल प्रोत्साहनन ही आपणा सर्वांची दृढ संकल्पशक्ती होती.

कऱ्हाडचे सुपुत्र, आपल्या शिक्षण संस्थेचे प्रवर्तक, आदरणीय ना. यशवंतराव चव्हाण यांचा ४६ वा वाढदिवस कऱ्हाडकरांनी मोठ्या दिमाखात साजरा केला. तेही साल १९५६ च! या निमित्ताने तुमच्या, वाङ्मंडळाने 'यशोदर्शन भाग १' हे चिमुकले ना. यशवंतरावांच्या बालपणीच्या, युवा जीवनातील साहसी आठवणीची पुस्तिका प्रसिध्द केली. तेच त्यांचे १ ले मुद्रित चरित्र असावे.

कऱ्हाडचे सुपुत्र, दृष्टे देशभक्त, क्रांतिकारी, स्वातंत्र्यसेनानी, व्यासंगी समाजसेवक, अभिजात साहित्यिक, निर्वैर राजकीय नेते ही ना. यशवंतराव यांची आजची ओळख. त्यावेळच्या भल्याभल्यांना नव्हती ! त्यांच्यातील उपजत, सात्विक जीवीनमूल्यांची जाणीव त्यांच्यासमवेत, राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या त्यांच्या बालमित्राना मात्र अनेक प्रसंग - घटनांतून होत असे. प्रसंगोपात त्याचा मौखिक आविष्कार कऱ्हाडमधील स्नेहीमंडळीतून अभावितपणे प्रकट होई. त्या मौखिक, पण प्रत्यक्षदर्शनी आठवणींचे, छोटे संकलन म्हणजेच तुमचे १ले, यशोदर्शन (भाग १) ! आज ती तुमची छोटी पुस्तिका एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरेल असा मला विश्वास वाटतो !

वयाच्या ४६ व्या वर्षी, ना. यशवंतराव चव्हाण हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. ( सन १९५९) भारतीय संघराज्यातील १ ला सर्वात तरूण मुख्यमंत्री म्हणून त्यांचा देशपातळीवर उल्लेख होत होता. त्यांनीच 'द्विभाषिक मुंबई राज्याचे - संयुक्त महाराष्ट्र राज्य म्हणून स्थित्यंतर घडवून आणले. महाराष्ट्राचे ते पहिले मुख्यमंत्री झाले. हा सर्व इतिहास, आपणा कऱ्हाडकरांना नक्कीच अभिमानासह, अहंकाराकडे नेणारा आहे. ते वास्तव आहे !!

माझ्या विद्यार्थि मित्रांनो ! ज्यावेळी ना. यशवंतराव यांच्या कार्यकर्तृत्वाचा अरूणोदय होत होता, त्या काळात तुम्ही ना. यशवंतरावाच्या भावी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक प्रगल्भ उत्कर्षांचे 'बीजांकूर' जमा केलेत. ते त्यांच्या 'आठवणी'च्या स्वरूपात. छोट्या छोट्या लेखातून ! निरागस बालमनाच्या तुमच्या प्रतिभेतून !! कविता, गद्य लेखन, माध्यमातून ते शब्दबध्द झाले आहेत. त्यातच खरे आदरणीय ना. यशवंतराव चव्हाण यांच्या भव्य, दिव्य जीवनकार्याचे भविष्यदर्शन घडते आहे. तुम्ही जमवलेल्या त्यांच्या आठवणीत, त्यांच्यातील उपजत, अभिजात, सात्विक, समता नि समष्टी जीवनाची मूल्ये प्रतिबिंबित होणारी आहेत. तुमचे हे अपूर्व भविष्यदर्शन- यशोदर्शन भाग १ ( १९५९) मुलभूत सामर्थ्य मानावे लागेल !

ना. यशवंतरावजींच्या जन्मशताब्दी ( २०१२-१३) संवत्सराच्या निमित्ताने- पुर्नमुद्रण-

२ री आवृत्ती तुम्ही आता प्रसिध्द करीत आहात. हा तुम्हा सर्व वर्गमित्रांचा संकल्पसुध्दा तुम्हा सर्वांच्या, सात्विक- शुध्द प्रेमाची साष पटवणारी कलाकृती ठरणार आहे.

या शताब्दी संवत्सराचे निमित्त साधून आज अनेक स्मृतीग्रंथ, समिक्षा, लेखमाला असे ना. यशवंतरावर्जीच्या जीवनमूल्ये व तत्वज्ञान यावर विपुल प्रकाशन - गाजावाजा करीत होते आहे. होणार आहे. अशा वेळी आपल्या प्रेमपुरूषांच्या पराक्रमांच्या, बालपणीच्या आठवणी म्हणजे, बालगोपालांनी आपल्या भावभक्तीने प्रज्वलित केलेल्या छोट्याशा निरांजनानी केलेली ती कुरवंडी, ओवाळणीच आहे. ही नक्कीच समयोचित, न्यायोचित, मांगल्यमय पवित्र घटना आहे.

ना. यशवंतरावर्जीच्या सान्निध्यात, बालवयापासून वावरलेल्या जीवलग मित्रांकडून मिळवल्या त्या आठवणी, आज त्या देवाघरी गेलेल्या त्यांच्या मित्रांच्या आत्म्यालाही संतुष्ट करणाऱ्या ठरतील. देशभक्त कै. शांताराम इनामदार, कै. श्री. अनंतराव (धनी) कुलकर्णी, कै. श्री. संभाजीराव थोरात, प्रसिध्द साहित्यिक व प्रकाशक कै. श्री. दयार्णव कोपर्डेकर, कै. श्री. प्र. ल. ऊर्फ शंकरराव करंबेळकर यांनी हे ~~सवर~~ मूल्यभांडार तुम्हापाशी उघडे केले आहे. तुमचा एक मार्गदर्शक- स्नेही म्हणून त्या बैठकीत उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले ! पण हे सर्व श्रेय तुम्हा सर्व बाललेखकांचे आहे. आशीर्वादार्थ कोणी असावे एवढाच या सर्व घटनेशी माझा ऋणानुबंध जुळून आला !'

'यशोदर्शन' दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाबाबत तुम्ही माझ्याशी संपर्क साधून 'आशीर्वाद' मागितलात हा तुमचा विनम्र मोठेपणा आहे. वयाचा व तुमच्या सर्वांशी जुळून आलेल्या गुरूवर्य या नात्याचा आदर करून माझे या तुमच्या उपक्रमाला अनंत शुभाशीर्वाद ! शुभेच्छा !'

'सर्व लेखक बालमित्रांनी, तुझ्यामार्फत, माझ्याशी संपर्क साधला. तू प्रत्यक्ष येऊन भेटलास. सविस्तर पत्राने मनोदय व्यक्त केलास, याचाही मला परम आनंद झाला आहे. म्हणून हा पत्रोत्तराचा प्रपंच.'

प्रकाशन समारंभ, तुम्ही आत्म समाधानार्थ, साधा आणि केवळ स्नेही परिवारासह करीत आहात. हे तर माझ्या दृष्टीने अपूर्व साहस आहे. सर्वाना पुनश्च शुभेच्छा !
आपणा सर्वांचा शुभाकांक्षी

**शाम घळसासी**

गुरूपौर्णिमा, आषाढ शु१५ शके १९३४

दि. ३ जुलै २०१२

**टीप :- संपादक मंडळाने गुरूवर्यांना यशोदर्शन ( २ री आवृत्ती ) याला प्रस्तावना घ्यावी अशी विनंती केली होती. गुरूवर्यांनी ती पत्र स्वरूपात दिली आहे. )**

# शोभे हा मुकुटमणी

शोभे हा मुकुटमणी, गुणाचा धनी, महाराष्ट्राचा ॥
मान दंड जहाला हा, 'अजिंक्य तारा' साताऱ्याचा ॥
भारताची धुरा खुशाल द्यावी ज्याच्या स्कंधावरी ॥
पसरली जयाच्या नेतृत्वाची कीर्ती भारतावरी ॥

वेरूळ अजिंठा कला, अन् उंची विंध्याद्रीची ॥
एकत्र जहाली येथे वृत्ती सह्याद्रीची ॥
साकार जाहले पावित्र्य जिथे कृष्णामाईचे ॥
वा भेटले परस्परांना येथे, कर्तव्य नि कैवल्य तियेचे ॥

उत्तुंग मनोरा कऱ्हाडचा उंचावी दर्पाने मान ॥
पण पाहता 'यशवंत' टाकला तयाने अभिमान ॥

– कवि – प्रफुल्ल शहा (१० ब)

# नामदार यशवंतरावजी चव्हाण यांच्या आठवणी

## १. यश देणारे यशवंतराव !

यशवंतरावाचं वय त्यावेळी दोन दिवसाचं होतं. त्यांच्या मातोश्री स्नानाकरता सकाळी निघाल्या असता त्यांचा तोल गेला. त्यांनी शेजारी असणाऱ्या मोकळ्या कणगीचा आधार घेण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळे अधिकच तोल जाऊन त्या जमिनीवर कोसळल्या. आघातानं त्यांची दातखिळ बसली. सारे घर भांबावले. काही सुचेना. अनेक उपचार झाले व बऱ्याच वेळानं यशवंतरावजींच्या आई शुध्दीवर आल्या. साऱ्यानांच आनंद झाला.

त्यावेळी यशवंतरावजींचे आजोबा म्हणाले,' मुलानं आपल्या आईला वाचवण्यात यश दिलं आहे. तेव्हा त्याचं नाव 'यशवंत' ठेवा ! असे आहेत यशश्री खेचून आणणारे यशवंतराव !!

संग्राहक - शरद कि. घाडगे ( १० अ )

*****

## २. वक्तृत्वाचा अभ्यास -

आपले वक्तृत्व श्री. यशवंतरावजींनी आपल्या शालेय जीवनातच परिश्रमाने संपादन केले. निसर्गाच्या सान्निध्यात त्यांनी वक्तृत्वाचा श्रीगणेशा गिरवला आहे.

दर श्रावणी सोमवारी आगाशिवाच्या डोंगरावर जाण्याची कऱ्हाडला चाल आहे. बालपणी हायस्कूलमध्ये असताना श्री. यशवंतराव आपल्या मित्रांबरोबर आगाशिवाला जात व वाटेवर एक मोठा विस्तीर्ण दगड पडला आहे तेथे हे सर्व लोक थांबत. त्यावर उभे राहून आसमंतातील वनश्री पुढे कोठल्या तरी विषयावर यशवंतरावजी व्याख्यान देत व मग पुढे वाटचाल होई. यशवंतरावजींचे बालमित्र श्री. बाबुराव मानेवाडीकर ही आठवण सांगताना म्हणाले आजही त्या बाजूस फिरकले तर तो पाषाण पाहून मला या प्रसंगाची आठवण होते.

संग्राहक - कु. उषा शहा

*****

## ३. निग्रह -

श्री. यशवंतराव टिळक हायस्कूलमध्ये इंग्रजी ५ वीत होते. त्यावेळी श्री. दुवेदी नावाचे अत्यंत कडक शिस्तीचे करारी मुख्याध्यापक होते. १९२८/२९ चे ऐन आंदोलनापूर्वीचे दिवस होते. अशाच एका दिवशी श्री. यशवंतरावजीच्या वर्गात असणाऱ्या एका विद्यार्थ्याने फळ्यावर 'वल्लभभाई पटेल यांना अटक' असा मजकूर लिहिला. श्री. दुवेदी वर्गात आले.

त्यांनी वर्गाला जंगजंग पछाडले. कोणीच लिहिणाराचे नाव सांगेना ! श्री. यशवंतरावजीचा राष्ट्रीय चळवळीकडे असणारा ओढा थोडा थोडा नुकताच प्रकट होऊ लागला होता. श्री. दुवेदीनी श्री. यशवंतरावाना व त्यांचे मित्र यांना नावे विचारली पण त्यांनी नाव सांगण्याचा साफ नकार दिला. झाले. शेवटी त्या दोघाना पाठीमागे बाकावर उभे राहण्याची शिक्षा फर्मावरली गेली. दोघेही निमूटपणे दिवसभर बाकावर उभे होते. शिक्षा भोगली पण आपल्या वर्गमित्राचे नाव सांगून त्यांनी सुटका करून घेतली नाही.

**संग्राहक – ब्रिजलाल चांडक ( १० अ )**

*****

## ४. १९३० च्या आंदोलनात –

१९३० च्या ऐन चळवळीत यशवंतरावाचा बराच मोठा वाटा होता. भूमिगत राहून त्यांचे कार्य चालू होते. रात्री वस्तीला ते कऱ्हाडमधील श्री. एकनाथ वास्के यांच्या दुकानी असत. रात्री गावात प्रमुख चौकातून 'बुलेटीन' चिकटून ते सकाळी दूर जात. चौकाचौकात पोलिसाचा पहारा होता. त्यांची नजर चुकवून श्री. यशवंतरावजी प्रकटन चौकात डकवत जात. प्रथम श्री. एकनाथ वास्के चौकातून पाणी आणण्याच्या निमित्ताने जाऊन येत व पोलिस नसल्याची खात्री झाल्यावर यशवंतराव कार्यभाग उरकत !

एक दिवस दडून पाळत ठेवणाऱ्या पोलिसाने यशवंतरावाना चौकातच पकडले, पण नशीब सिकंदर असल्यामुळे यशवंतराव त्यातूनही निसटले.

श्री. एकनाथ वास्केना यातून त्रास होणार हे यशवंतरावजींच्या लक्षात येताच ते आपणहून पोलिस स्टेशनवर हजर झाले !

आपल्यासाठी दुसऱ्याला कसलाही त्रास होणार नाही याकडे श्री. यशवंतरावजींचे कटाक्षाने लक्ष असते.

**संग्राहक – मदन ए. वास्के ( १० क )**

*****

## ५. भविष्यवाणी –

यशवंतरावजी चव्हाणांच्या लग्न समारंभाला साऱ्या महाराष्ट्रातून कार्यकर्ते जमा झाले होते. उत्साहाला व मांगल्याला जिकडे तिकडे भरती आली होती.

या सोहळ्यातच दे.भ. रामानंद भारती यानी ना. यशवंतरावजींच्याबद्दल एक विधान केले... ते म्हणाले–

...' श्री. यशवंतरावजी चव्हाण हे सातारा जिल्ह्याचे पंडित नेहरू आहेत.''

आज वीस वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच ही भविष्यवाणी साकार झाल्याचं दिसत आहे !

**संग्राहक – सु. बा. वंजारी ( १० अ )**

*****

## ६. गुरूप्रेम

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकाच्या जीवनात असं काही चिरस्मरणीय संभवेल हे कदापि शक्य नाही ! कारण लोकशाहीत सामान्यातून श्रेष्ठ नेते जन्मतात पण त्यांच्याकडून आपल्या श्रेष्ठत्वाला पहिले वळण देणाऱ्या प्राथमिक शिक्षकाचे स्मरण राहातेच असे नाही.

श्री. यशवंतरावजींचे गुरूजी श्री. बा. सा. बुधकर हे एकदा आपल्या मुलाकडे मालाडला गेले होते. मुंबईच्या परिसरात गेल्यामुळे एका काळच्या आपल्या विद्यार्थ्याला – ना. यशवंतरावजीना – भेटण्याची त्यांना इच्छा झाली. त्यांनी मुख्यमंत्र्यांना कळवले. श्री. यशवंतरावजींनी ताबडतोब स्वत:ची गाडी पाठवून त्यांना निवासस्थानी आणले व चार पाच तास गतस्मृती व योगक्षेमाच्या गोष्टी केल्या. व तातडीने जाण्याची इचछा व्यक्त करताच श्री. यशवंतरावजी म्हणाले,' तुम्ही काही काळजी करू नका मी तुम्हाला जाण्याची घाई आहे हे जाणतो. तुम्हाला वेळेवर पोहोचवण्याची जबाबदारी माझ्यावर आहे ! पुन्हा थोडावेळ गप्पा झाल्या व पुन्हा आपल्या गाडीतून मोठ्या इतमामाने त्यांना घरी पोहोचवले.

आपल्याबद्दल दाखविलेला जिव्हाळा, प्रेम व आदर कसा अकृत्रिमपणे त्याच्या सहवासात व्यक्त झाला हे सांगताना श्री. बा. सा. बुधकरांना आजही गहिवरून येते !

**संग्राहक – सुधाकर अ. मंत्री ( १० अ )**

*****

## ७. संयम –

१९४२ च्या आंदोलनाच्या काळात एक पोलिस अधिकारी अत्यंत क्रुरपणे वागत होते. या त्याच्या वर्तनाचा ब्रिटीश राजवटीत खूपच उदोउदो झाला होता. श्री. यशवंतरावजी भूमिगत झाल्यानंतर याच पोलिस अधिकाऱ्याकडून श्री. यशवंतरावजींचा तपास काढण्याच्या उद्देशाने सौ. वेणूताई चव्हाण यांना अटक व त्रास झाला होता व त्याच्या उध्दट वर्तनाचा कोणाला संताप यावा असेच त्याचे सतत वागणे असे. स्वातंत्र्य मिळाले. व यशवंतरावजी मंत्री झाले. कऱ्हाडला आल्यानंतर याच पोलिस अधिकाऱ्याची गाठ श्री. यशवंतरावजीशी पडली पण श्री. यशवंतरावजींनी त्याच्या वर्तनानी कधीच ओळख दिली नाही. एकदा श्री. यशवंतरावजींना त्यांचे एक स्नेही म्हणाले,' तुम्हाला या अधिकाऱ्याचा संताप कसा येत नाही ? त्यानं किती अनन्वित छळ केलाय तुमचा, ते तुम्हाला स्मरतं कां नाही ?

श्री. यशवंतराव म्हणाले, सारं काही मला आठवते व मनस्तापही होतो ! पण – ''... मी गत घटना विसरून जाण्याचा सतत प्रयत्न करीत असतो !''

**– संग्राहक – शि. बा. बटाणे ( इ. ९ वी )**

*****

## ८. लोकशाही –

प्रांत पुर्नरचनेच्या अंमलबजावणी नंतरच्या संतप्त वातावरणात घडलेली घटना आहे ही !

एका शाळेला भेट देण्याबद्दल ना. यशवंतरावजींना अगत्याचं नि आग्रहाचं निमंत्रण आल्यावरून ते त्या विद्यालयात गेले. एका वर्गात प्रवेश करताच एका विद्यार्थ्याने अनुचित घोषणा केली. या अनपेक्षित घटनेमुळे विद्यालयाचे मुख्याध्यापक, चालक वगैरे अगदी भांबावून गेले व त्यांना काय करावे हेच सुचेना. श्री. यशवंतरावजी भेट देऊन परत गेले. झाल्या प्रकाराबद्दल शाळा चालकांनी त्यांचेजवळ क्षमेची याचना केली व विद्यार्थ्याला कडक शासन करण्याचा इरादा व्यक्त केला. तेव्हा श्री. यशवंतरावजी म्हणाले,' छे, छे, असे काहीच करू नका ! लोकशाहीत अशा घटना घडणारच !' त्या अटळ असतात !

**संग्राहक – प्रताप ज्ञा. चव्हाण ( १० अ)**

*****

## ९. एक बाका प्रसंग –

१९४२ च्या चलेजावच्या चळवळीत कराड तालुक्याचे नेतृत्व श्री. यशवंतराव चव्हाण यांचेकडे आले होते. यशवंतरावानी मामलेदार कचेरीवर मोर्चे, बुलेटिन्स इत्यादी मार्गानी जनतेत जागृती करून इंग्रज सरकारला बेचैन करून टाकले होते. त्यामुळे यशवंतरावजीना पकडण्यासाठी येथील पोलिस अधिकाऱ्यानी जीवाचा आटापिटा चालविला होता.

एके रात्री यशवंतराव शेणोली स्टेशनवर रात्री साडे दहाच्या सुमारास पुण्यास जाणाऱ्या गाडीत चढले ते इंटरच्या डब्यात बसले. आपण सहज प्रवाशांच्या नजरेस येऊ नये म्हणून तातडीने त्यांनी इंटरमधील वरच्या फळीवर ( बर्थवर ) जागा पटकाविली आणि झोपेचे सोंग घेतले.

गाडी कराड स्टेशनवर आली आणि यशवंतराव ज्या इंटरच्या डब्यात बसले होते. त्या डब्यात एक प्रवासी चढला. यशवंतराव झोपलेल्या बर्थच्या खालचे रिकाम्या असलेल्या बाकावर तो प्रवासी येऊन बसला. यशवंतरावानी हळूच बघितले आणि त्यांच्या मनात चर्रर झाले. तो प्रवासी कोण होता ठाऊक आहे ? तो प्रवासी म्हणजे कुप्रसिध्द फौजदारांचा हस्तक होता. या चळवळीत कार्य करणाऱ्या लोकांची फौजदाराना माहिती देणे, त्यांना

पकडून देण्यास मदत करणे हे त्याचे काम. या कामासाठी त्याला फौजदाराकडून चांगली कमाई होत असे, असे म्हणतात. इतकेच नव्हे तर फौजदारांचे आणि त्याचे असलेले नाते लोकाना ठाऊक होते. त्यामुळे काही निरपराधी आणि चळवळीपासून अलिप्त असलेल्या लोकाना हे कुप्रसिध्द फौजदार पकडून आणीत आणि हे गरीब बिचारे लोक या हस्तकाकडे जाऊन आपली सुटका करून घेत. ते फौजदार आणि हा हस्तक यांचा असा बनाव होता. चळवळीच्या धामधुमीत त्या हस्तकाने आणि फौजदाराने आपले उखळ पांढरे करून घेतले असेल तर त्यात नवल काय? हा हस्तक किती भयानक होता याची कल्पना यावी म्हणून ही त्यांच्याबद्दलची माहिती दिली असा हा भयानक हस्तक यशवंतरावांच्या खालीच बसल्याने यशवंतरावांच्या मनात चर्रर झाले असल्याचे नवल कसले. एखादा हिंस्त्रपशु आपल्या जवळ यावा म्हणजे भीती वाटेल तीच भीती त्यांना वाटली. पण यशवंतरावांनी आपले झोपेचे सोंग अधिकच हुबेहुब वठविण्यास सुरवात केली.

त्या हस्तकाने आपली बॅग बाकावर ठेवली आणि तो फलाटावर उतरला. गाडीला टेकून गाडीच्या खिडकीजवळ कोणाशी तरी बोलत तो उभा राहिला होता. यशवंतरावांनी हा कोणाशी बोलतोय हे पाहण्यासाठी हळूच डोळ्यावरची धाबळी दूर करून सटकन पाहिले. तो त्यांना कोण आढळले म्हणता ! त्या हस्तकाचे जीवलग दोस्त असलेले कुप्रसिध्द फौजदार ! फौजदार आणि तो हस्तक यांचे खलबत फलाटावर चालू होते. त्यांचे भाषण काही यशवंतरावांना नीट ऐकू येत नव्हते. पण ते अशा चळवळ्या लोकाना पकडण्याबाबत काही तरी हिकमत लढविण्याबाबत असावे असे मात्र यशवंतरावंनी ओळखले. त्या फौजदारांना पाहिल्यापासून यशवंतरावाना धडकी भरली होती. फौजदार आणि हस्तक यांना ते भीत होते असे नव्हे तर आपण जर पकडलो गेलो तर चळवळीच्या आपल्या योजना धुळीस मिळणार या कल्पनेची त्यांना भीती वाटत होती.

तो हस्तक आणि तो फौजदार हे दोघेही गाडीत बसणार की काय याची शंका त्यांच्या मनात आली आणि त्यांना अस वाटले की आता आपली अवस्था क्रुर श्वापदाच्या घशात अचानकपणे पडणाऱ्या एखाद्या सावजाप्रमाणे झाली आहे. त्यामुळे ते फारच अस्वस्थ झाले. गाडी कराड स्टेशनवर जवळ जवळ २० मिनिटे थांबते ती एकदा केव्हा सुटेल असे वाटले. ते फौजदारही गाडीत येतात की काय याबद्दल ते सचिंत होते. एवढेच नव्हे तर डब्यातल्या प्रवाशांची ते चौकशी करतात की काय अणी शंका यशवंतरावजींना आल्यावाचून राहिली नाही. डोक्यातील अशा तऱ्हेच्या शंका आणि मनातील वाढती भीती या अवस्थेत ते असताना गाडीची शीट वाजली. गाडी चालू झाली. फलाटावर उभे असलेल्या फौजदाराचा त्या हस्तकाने 'अच्छा' म्हणून घेतलेला निरोप यशवंतरावानी ऐकला आणि क्षणार्धात

त्यांना कळले की आपल्या खालच्या बाकावर एकटा तो हस्तक आपली पथारी पसरत आहे. यशवंतराव धाबळीत उघडलेल्या डोळ्यांनी त्या हस्तकाची हालचाल पहात होते. तो हस्तक पथारीवर झोपला असल्याचे यशवंतरावांनी पाहिले. पण त्यानेही आपल्या सारखीच झोपेची बतावणी केली आहे की काय याची ही शंका त्यांना येत होती. अखेर कोरेगाव स्टेशन जसे जवळ येऊ लागले तसे त्यांनी तो हस्तक निश्चिंत झोपला असल्याची खात्री करून घेतली आणि गाडी स्टेशनवर थांबताच हळूच फलाटावर ते उतरले.

पुण्याला जाणाऱ्या यशवंतरावांना कोरेगावला उतरायला लागले. कारण त्या हस्तकाच्या नजरेला पडले असते ते गिरफदार झाले असते, आणि पुढच्या सर्व योजना बारगळल्या असत्या. यशवंतरावांना पकडणे हा त्यावेळी पोलिसांचा पुरूषार्थ होता. आयती पकडण्याची संधी या हस्तकाला चालून आली होती. पण यशवंतरावांचे नशीब सिकंदर म्हणून आणि प्रसंगावधान राखल्याने ते या गंभीर प्रसंगातून निभावून नेले आणि तो हस्तक देशद्रोही कमाईला उंचवला. अशा देशद्रोहींचा धि:क्कार असो. आणि अशा कर्तबगार नेत्याचा सदैव विजय असो. अशीच प्रार्थना खरा भारतीय परमेश्वरापाशी करील यात शंका नाही !

**संग्राहक – देवदत्त ऊर्फ अनिल श्री. देशपांडे ( १० अ )**

*****

## १०. गुणग्राहकता –

१९५७ च्या गणेशोत्सवातील खुद्द मुंबईत निवासस्थानी घडलेली घटना आहे ही !

श्री. यशवंतरावजींच्या घरी गणपतीपुढे रोज एका अभिजात कलावंताचा कार्यक्रम होत असे. त्या दिवशी महाराष्ट्राचे ख्यातनाम वयोवृध्द गानसम्राट बालगंधर्व यांचा कार्यक्रम होणार होता. श्री. नारायण राजहंसाचे स्वागत खुद्द मुख्यमंत्र्यांनी दाराशी येऊन केले. नारायणरावंना वायुमुळे चालता येणे कठीण होते. स्वत:च्या हाताने आधार देऊन यशवंतरावानी त्याना गणेश हॉलमध्ये नेले. पहिल्या पदातच बालगंधर्वानी सारा श्रोतृवर्ग भारून टाकला होता. पण त्यांच्या वयामुळे व शारीरिक क्षीणतेमुळे त्याना गाणे त्रासाचे होत असावे, असे यशवंतरावजीना वाटले. त्यांनी नारायणरावाना संकोच होऊ नये म्हणून म्हटलं,' आपण आता लवकर थकता पुरे झाले !' पण नारायणरावांनी तक्याचा आधार घेऊन थोडा वेळ पुन्हा गणेशाची सेवा केलीच, शेवटी स्वत: यशवंतरावजीना हार घालण्याची इच्छा प्रदर्शित केली तेव्हा यशवंतरावजी म्हणाले,' आज तुम्ही माझ्या घरी आला आहात तेव्हा मीच तुमचा पुष्पहार घालून सत्कार करणार, आपण हे उलट कसं अपेक्षिता ?'

तेव्हा नारायणरावानी सांगितलं,' आपण मुख्यमंत्री झाल्यापासून मी या गोष्टीची आत्यंतिक

मनिषा बाळगून आहे. तेव्हा माझी एवढी इच्छा पूर्ण होऊ द्यावी.'.

ना. यशवंतरावजींचा नाईलाज झाला. उठणं अशक्य असणाऱ्या श्री. नारायणरावांचा उठण्याचा प्रयत्न पाहून पुढे स्वत:च जाऊन त्यांनी किंचित वाकून त्यांच्या हारांचा स्वीकार केला व नारायणरावाना उठण्याची तसदी पडू दिली नाही.

सोज्वल सत्तेचा कलेनं केलेला सत्कार पाहून उपस्थितांचे मनात आनंदाचा सागर हेलावला आणि कलेपुढे विनम्र झालेली सत्ता पाहून कोणाही रसिकाला केशवसुतांच्या खालील ओळी आठवल्या असत्या –

'गाणे जे परिसावया कविपुढे राजेश ही वाकले'

**संग्राहक – अशोक प्र. करंबेळकर ( १० अ )**

*****

# ११. नाकारलेले आहेर –

दोन तीन वर्षापूर्वीच श्री. यशवंतरावजीच्या पुतणीचे ( लीलाबाईचे) लग्न होते अर्थात समारंभाला अतोनात गर्दी जमली होती. प्रत्यक्ष लग्नप्रसंगी तर सारे पटांगण लोकांनी फुलून गेले होते.

प्रत्येकाने आपापल्यापरी आहेर आणले होते. अंदाजच करायचा झाला तर कमीत कमी पंचवीस हजाराच्या आत बाहेर सारे आहेर वधूपक्षाकडे जमले असते. जो तो त्या आहेर सुपूर्त करण्याच्या क्षणाची आतुरतेने वाट पहात होता.

'यशवंतरावजींचे स्नेहानो नि आप्तेष्टानो !' यशवंतरावजींच्या वतीने दूरध्वनीतून जाहीर करण्यात आले की, आपण समारंभाला उपस्थित राहून व्यक्त केलेले प्रेम शब्दानं मोजता येणार नाही. यशवंतरावजी आपले अत्यंत आभारी आहेत. त्यांची एकच आग्रहाची विनंती आहे की, वधुपक्षाकडे आलेले आहेर स्वीकारता येत नाहीत. त्याबद्दल दिलगीर वाटते. कोणीही आहेर करण्याचा आग्रह धरू नये.

केवढा हा मनाचा थोरपणा –

**संग्राहक – एकनाथ तातोबा अंबवडे ( १० )**

*****

# १२. साकार सोज्वलता –

सामान्यपणे पैसा, सत्ता व कीर्ती या तिन्हीही गोष्टी मनुष्याजवळ असतील तर तो गर्विष्ठ बनतो हे एक व्यावहारिक सत्य आहे ! पण ही गोष्ट ना. यशवंतरावजींचे बाबतीत मात्र असत्य ठरली आहे.

ना. यशवंतरावजी नुकतेच मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले होते व त्यावेळी ते प्रथम कऱ्हाडला आले तेव्हाची गोष्ट ! नेहमीप्रमाणे ते घरी आल्यावर श्री. राजाभाऊ धनी यांचे घरी गेले. श्री. यशवंतरावजी येत असलेले पाहून 'या या ' बसा असे त्यांचे स्वागत केले. तेव्हा यशवंतरावजी म्हणाले,' हे असे काय करता आहात? मी जरी मुख्यमंत्री असलो तरी तुमच्या घरी मी लहानपणी खेळलेला, बागडलेला खोडकर यशवंताच आहे...'

या त्यांच्या उद्‌गारतून त्यांचा सोज्वळ निरहंकारी स्वभाव प्रकट होतो नाही का ?

**संग्राहक – अनंत आपटे ( १० अ )**

*****

# १३. थोर मन –

स्वत:च्या देखत स्वत:चा झालेला उपमर्द कोणा राज्यधुरिणाला सहन झाला आहे? आणि त्याहीपेक्षा अशा व्यक्तीची शक्य तेवढी सेवाच करणाऱ्या विभूति 'युगायुगातून एक' या प्रमाणेच संभवतात !

काही कामानिमित्त एक ख्यातनाम वैद्य श्री. यशवंतरावाजींना भेटण्यासाठी आले होते. वैद्यराजांची तपश्चर्या मोठी होती. एक सिध्दहस्त धन्वन्तरी म्हणून त्यांनी मोठी कीर्ती संपादन केली होती. अशा वयोवृध्द अंधगलितगात्र वैद्यराजाचा आदर मुख्यमंत्र्यांनी यथास्थित केला. वैद्यराजानी आपल्या आगमनाचा हेतू व्यक्त करताच श्री. यशवंतरावजीनी त्याच्या कामासंबंधी अशक्यता दाखवून दिली व परोपरीने सदरचे कागद अयोग्य व अप्रस्तुत कसे आहे ते समजावण्याचा प्रयत्न केला. पण महाकोपिष्ट वैद्यराजाना ते सहन झाले नाही. संतापाच्या भरात तोंडून अयोग्य व असह्य विधान बाहेर पडले. श्री. यशवंतरावजीनी अयोग्य काहीही माझ्याकडून अपेक्षू नका असे सांगितले व त्यांना दरवाजापर्यंत आधार देऊन पोहोचवले !

अर्धा तास ही घटना घडून झाला नव्हता एवढ्यात वर उल्लेखलेल्या वैद्यराजांचे एक जवळचे आप्त श्री. यशवंतरावजीना भेटण्यास काही कामानिमित्त आले. श्री. यशवंतरावजीनी झाल्या अनुचित प्रकाराची यत्किंचितही जाणीव न देता त्यांचे काम तातडीने केले !

ज्या वेळी वरील प्रकार उपकृताला नंतर कळला तेव्हा त्याच्या मनाची काय स्थिती झाली असेल? व त्यांना थोर मनाच्या यशवंतरावजीच्या खंबीर पण निरोगी अंत:करणाची प्रचिती आली असेल ! हे वाचकांना वेगळ्या शब्दात सांगण्याची गरज नाही !

**संग्राहक – शशिकांत पलुस्कर ( १० अ )**

*****

## १४. भेट -

निवडणुकीचा आदला दिवस होता तो ! सकाळीच काही कामासाठी मी 'पाटण कॉलनीकडे' चाललो होतो. पाटण कॉलनीत वळलो अन् पुढे निघालो. श्री. यशवंतरावजी त्याच रस्त्याने प्रचार करीत चालले होते.

वाटेतच त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. केशवराव पवार यांचे घर होते. मनातील साऱ्या शत्रुभावना काढून श्री. यशवंतराव त्यांचे घरी निघाले. मनमोकळेपणाने ते जात होते. माझे मन कोणत्या तरी उदात्त विचारांनी भरून गेले. सारे तात्विक व राजकीय मतभेद विसरून जाऊन ते पुढे निघाले होते. आपला प्रतिस्पर्धी या नात्याने त्यांनी त्यावेळी त्याना ओळखले नाही, तर आपल्या कराड गावातील एक बांधव या नात्याने, ते त्यांच्याकडे निघाले होते. रस्त्यावरील सारी जनता– सामान्य तशीच सुशिक्षित ही – स्तिमित होऊन तो प्रसंग पाहण्यासाठी उभे होते. एवढे उच्च व उदात्त विचार त्यांनी पूर्वी पाहिलेले नव्हते. पुराणांतरी प्रसंगांत अगर कथात त्यांनी ते कदाचित वाचले असावेत पण सुधारलेल्या युगाप्रमाणे त्यावर विश्वास ठेवण्याची त्यांची तयारी नव्हती. श्री. यशवंतरावजीनी आज सगळ्याना धडा घालून दिला होता. देशोन्नतीचे गमक जे सहकार्य त्याचे प्रात्यक्षिक, महान प्रात्यक्षिक करून दाखवित होते. तेथे उभ्या राहिलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात विविध विचार येऊन गेले. पण दर विचारासारखा त्यांचा श्री. यशवंतरावजींच्याबद्दलचा सादर प्रतिगुणित होत होता, सहकार्याची त्यांना जाणीव होत होती, विश्वबंधुत्वाची– खऱ्याखुऱ्या विश्वबंधुत्वाची त्यांना ओळख पटत होती आणि तसेच श्री. यशवंतरावजींच्या उदार मनाविषयीची विशाल अंत:करणाविषयीची व मोठेपणाविषयीची त्यांची खात्री पक्की झाली होती.

श्री. यशवंतरावजी घराजवळ पोहोचले. तेवढ्यात श्री. पवार बाहेर आले. मोठ्या सहानुभूतीने, निशंक मनाने दोघानीही हस्तांदोलन केले. दोन शब्द एकमेकाशी बोलले. खरीखुरी भारतीय संस्कृती तेथे प्रकटली होती. भारतीय संस्कृतीचे ते महान प्रतिक होते. प्रतिस्पर्ध्याशीसुध्दा खिलाडूवृत्तीने वागण्याची परंपरा ते चालवित होते. ज्या संस्कृतीत दिवसभर युध्द करून सायंकाळी पांडव–कौरवांच्या– भीष्माचार्यांच्या निवासस्थानी जात व त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलत, त्या संस्कृतीच्या आधारानेच आखाड्यात उतरल्याबरोबर दोन पहेलवान एकमेकांशी हस्तांदोलन करतात. दुसऱ्या दिवशीच्या निवडणुकीच्या सामन्यातील जणू ती आदल्या दिवशी दिलेली सलामी होती असे मला वाटले ज्या ज्या वेळी गावातील एकादा प्रसंग चांगला तसाच वाईटही मला दिसतो त्यावेळी मला त्या प्रसंगाची तीव्रतेने आठवण होते व श्री. यशवंतरावजींच्याबद्दलचा माझा आदर शतगुणित होतो.

**– संग्राहक – अनिल म. खंडकर ( १० अ )**

*****

## १८. यशवंतरावांनी पोलिसास दिलेला गुंगारा -

१९४२ साली श्री. यशवंतराव भूमिगत होते. त्या वेळची गोष्ट. पोलिसखात्याच्या 'पाहिजे' च्या यादीत यशवंतरावंचे नाव अग्रेसर होते. पोलिससारखे त्यांचा सुगावा काढण्याच्या यत्नात होते. अशावेळी एके रात्री यशवंतराव पुण्याहून कराडकडे निघाले होते. रात्री साडे दहाच्या सुमारास ते पुणे स्टेशनवर इंटरच्या डब्यात चढले. गाडी सुटण्याच्या वेळी एक गृहस्थ त्यांच्या डब्याजवळ येऊन त्यांना पाहून गेला. गाडी सुरु झाली. ती पॅसेंजर गाडी असल्याने प्रत्येक स्टेशनवर उभी राही. स्टेशनवर गाडी उभी राहिली की तो गृहस्थ यशवंतरावांच्या डब्याजवळ येई आणि त्यांना पाहून जाई. ४-५ स्टेशने असे झाल्यानंतर यशवंतरावाना त्या गृहस्थाचा संशय आला. तो गृहस्थ माझी टेहळणी करत असावा असे त्यांना वाटले. तो गृहस्थ यशवंतरावांच्या यशवंतरावांच्या डब्याच्या २-३ डबे पुढे असलेल्या सेकंड क्लासमध्ये बसलेला होता. तो सी.आय.डी. ऑफिसर असावा हे त्याना ओळखण्यास अडचण पडली नाही. पण हे कळूनही वळत नव्हते अशी त्यांची स्थिती होती. अशा अगतिक अवस्थेत असताना गाडी नीरा स्टेशनावर येऊन थांबली. यशवंतराव खाली फलाटावर उतरले आणि फलाटावर इकडे तिकडे येरझाऱ्या घालू लागले. तो गृहस्थ ही सेकंड क्लासच्या डब्यातून खाली फलाटावर आला आणि यशवंतरावांच्या अनुरोधाने तोही इकडे तिकडे करू लागला. त्यांची नजर यशवंतरावजींच्या हालचालीकडे होती हे यशवंतराव जाणून होते आणि यशवंतरावाची दृष्टी त्याच्या हालचालीकडे होती. ही गोष्ट मात्र त्या अधिकाऱ्याच्या लक्षात आली नसावी. येरझाऱ्या घालीत असताना त्या अधिकाऱ्याला कसा गुंगारा देता येईल. याबाबतचे विचार यशवंतरावांच्या डोक्यात घोळत होते. आणि या अधिकाऱ्याच्या तावडीतून निसटणे जरूर आहे. असा त्यांनी मनाशी निर्णय घेतला. गाडी सुटण्याची शीट झाली. सारे उतारू डब्यात चढले. यशवंतरावही त्यांच्या डब्याजवळ गेले. तो पोलिस अधिकारीही त्याच्या डब्याजवळ गेला मात्र तेथून त्याची नजर यशवंतरावाकडे सारखी लागली होती. गाडी सुटली यशवंतराव आपल्या डब्यात चढले. ते डब्यात चढलेले नक्की पाहून तो अधिकारीही आपल्या डब्यात चढला. यशवंतरावांनी क्षणात खिडकीतून बाहेर डोकावून तो अधिकारी डब्यात चढल्याची खात्री करून घेतली आणि तात्काळ आपली छोटी बॅग हातात घेऊन चालत्या गाडीतून फलाटावर उडी घेतली. त्या अधिकाऱ्याला चुकवून यशवंतराव निसटले परंतु लोणंद स्टेशनवर त्या अधिकाऱ्याने यशवंतरावाची चाहूल घेतली पण यशवंतरावाची जागा त्यांच्या अभावी रिकामी असल्याची त्याच्या नजरेस आले. केवढी निराशा झाली त्याची ! इकडे यशवंतराव स्टेशनच्या बाहेर एकटेच रेंगाळत होते. रात्री १/१/३० वाजता भयाण अंधाऱ्या रात्री दिव्याचा प्रकाश अंधाराचा अंदाज देत होता. अशा वेळी एकट्यादुकट्याने रेंगाळणे किती धोक्याचे होते, ना ओळख, ना आधार ना आसरा ! मोठी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली. स्टेशनमधल्या

पोलिसांनी पाहिले असते तर त्यांना चोर लफंगा म्हणून बसवून ठेवले असते व तसे झाले असते तर सगळेच बिंग बाहेर आले असते.

पण संकटाच्य वेळी परमेश्वर कोणत्या तरी रूपाने धावत येतो याचा अनुभव यशवंतरावाना त्यावेळी आला. नीरा स्टेशनच्या बाहेर एक मिलिटरीचा मालट्रक उभा होता. यशवंतरावांनी त्या ट्रकच्या ड्रायव्हरशी बोलणे सुरू केले. त्या ड्रायव्हरलाही कळून चुकले की हा एक भूमिगत कार्यकर्ता आहे. तो ड्रायव्हर इंग्रजांच्या मिलिटरीचा नोकर होता. पण त्याचे मन भारताचे होते. त्याने यशवंतरावाना आधार दिला आणि आपल्या ट्रकमधून बारामतीच्या आसपास सोडून दिले. सर्वसामान्य लोकांच्या ठायी केवढे देशप्रेम होते, याचा अनुभव यशवंतरावाना त्यावेळी मिळाला. इंग्रजांचे राज्य राखण्यासाठी पगार घेणारा तो ड्रायव्हर, इंग्रजांचे राज्य उलथून पाडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मदतीसाठी धावून आला हे पारतंत्र्याला लागलेल्या अखेरच्या घरघरीचे लक्षण नव्हे काय? कुठे तो पैशासाठी देशद्रोह करणारा सी.आय.डी. अधिकारी आणि कुठे हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी होईल ती मदत करणारा ट्रकड्रायव्हर. या ट्रक ड्रायव्हरसारखी इमानी माणसे होती म्हणूनच स्वातंत्र्य मिळाले.

**संग्राहक – अशोक प्रभाकर करंबेळकर ( १० अ )**

*****

## १६. तत्वनिष्ठा व बंधूप्रेम –

श्री. यशवंतरावजीचे थोरले बंधू श्री. गणपतराव मोठे कर्तबगार व धडाडीचे म्हणून प्रसिध्द होते. त्यांचे यशवंतरावांच्यावर गाढ प्रेम होते. यशवंतरावांनाही त्यांच्यावर पितृतुल्य आदर.

१९३५–३६ चा सुमार असावा. येथील नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसने भाग घेतला होता. त्या निवडणुकीत गणपतराव हे एक स्वतंत्र उमेदवार होते आणि यशवंतराव काँग्रेसचा प्रचार करीत होते. यावेळी यशवंतरावांच्या तत्वनिष्ठेचा कस होता. यशवंतरावांनी श्री. गणपतरावांचे विरूध्द प्रचार करून काँग्रेसला मत मिळवून देण्याचा जाहीरपणे प्रयत्न चालू केला ही गोष्ट त्यांच्या तत्वनिष्ठेची नव्हे कां ?

पण त्यांचे परस्पराचे प्रेम किती होते ठाऊक आहे ? गणपतराव हे आजारपणात अंथरूणावर खिळून होते. एके दिवशी यशवंतराव त्यांचा निरोप घेऊन परगावी निघाले. 'तेवढ्यात गणपतरावांनी आपला भाचा शामराव याला अंथरूणाजवळ बोलावले आणि त्याच्या हाती उशाखाली १० रुपयाची नोट देऊन त्याला सांगितले की,' हा गावाला निघाला आहे त्याच्या शिखात एक पैही नसेल ही नोट त्याच्या शिखात घालून ठेव.'

असे बंधूप्रेमाचे प्रसंग अनेकानी अनेक वेळा पाहिले आहेत !

काय हे प्रेम व काय ही तत्वनिष्ठा !

**– संग्राहक – कु. विजया द. घळसासी ( ८ अ )**

यशोदर्शन पुनःप्रकाशनाला हार्दिक शुभेच्छा !

# चांडक ऑटोमोबाईल्स

सिएट, बिर्ला, ब्रिजस्टोन इ. नामांकित कंपन्यांचे टायर व ट्युबचे विक्रेते

सोसायटी पेट्रोल पंपाजवळ, पादचारी उड्डाणपुलाची पश्चिमबाजू,
कोल्हापूर – पुणे रोड, मलकापूर, कराड.
फोन नं. (०२१६४) २२५६७८ मोबा. ९४२३८६८१२५

यशोदर्शन पुनःप्रकाशनाला हार्दिक शुभेच्छा !

# महाराष्ट्र ऑटो मशिनरी स्टोअर्स

सिग्मा वायर व केबलचे अधिकृत विक्रेते

३४/२, शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा
फोन नं (०२१६४) २२२८५७ मोबा. ९४२२४०१११९